परळी
# संघर्षनेता
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...
https://www.parlisangharshneta.in 9881265102
संपादक - मोहन व्हावळे






बीड | वर्षे- 10 वे | अंक क्र. 241 | गुरुवार दि. 18 सप्टेंबर 2025 | पृष्ठे 4 किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060

# ना. पंकजाताई मुंडेंचा परळी, अंबाजोगाईत हाऊसफुल्ल जनता दरबार

## शिस्तबद्ध नियोजनाने जनतेच्या समस्यांचा जागेवर निपटारा







परळी वैजनाथ।दिनांक 18। राज्याच्या पर्यावरण, वातारणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचा आज परळी व अंबाजोगाई येथे हाऊसफुल्ल जनता दरबार झाला. त्यांना भेटून समस्या मांडण्यासाठी सर्व सामान्य नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. ना. पंकजाताईंनी प्रत्येकाला वैयक्तिक भेटून त्यांची गाऱ्हाणी ऐकली व त्यांच्या प्रश्नांचा जागेवरच निपटारा केला. ना. पंकजाताई मुंडे रात्री बीड येथील कार्यक्रम आटोपून उशीरा शहरात आगमन झाले. शासकीय विश्रामगृह येथे आज सकाळी त्यांनी जनता दरबार घेतला. तहसीलदार व्यंकटेश मुंडे, पालिकेचे पान 3 वर

### जनतेसाठी शिस्तबद्ध नियोजन

कामे घेऊन येणारांची दरवेळेस होणारी प्रचंड गर्दी लक्षात घेऊन ना. पंकजाताईंनी या दौऱ्यात भेटीचे शिस्तबद्ध नियोजन केले होते. प्रचंड गर्दीमुळे नियोजन कोलमडते, हा अनुभव पाहून आलेल्या प्रत्येकाचे काम मार्गी लागले जावे, त्यांचे प्रश्न ऐकले जावेत यासाठी या दौऱ्यात जिल्ह्यातील सहाही मतदारसंघाला दिवस आणि वेळ निश्चित करून दिला. सकाळी परळी मतदारसंघाचा तर दुपारी अंबाजोगाई येथे केज मतदारसंघासाठी जनता दरबार घेतला. अतिशय शिस्तबद्ध रितीने कुठलाही गडबड, गोंधळ न होता सर्व सामान्य माणूस त्यांच्यापर्यंत आपल्या समस्या मांडून त्या सोडवू शकला, या नियोजनामुळे अभ्यागतांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले.

# कर्नाटकात 6018 नाव वगळली, महाराष्ट्रात 6850 जोडली, पण मतदारांचा थांगपत्ता नाही,

## राहुल गांधींचा वोटर लिस्टमधील गडबडीचा तो मोठा दावा




काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा केंद्रीय निवडणूक आयोग आणि भारतीय जनता पक्षाला मत चोरी प्रकरणात घेरले. राहुल गांधी यांनी गुरुवारी 18 सप्टेंबर रोजी पत्रकार परिषद घेतली. ते हायड्रोजन बॉम्ब फोडणार असं सांगण्यात येत होते. ण त्यांनी गेल्यावेळीप्रमाणेच काही उदाहरणं देत मत चोरीचा पॅटर्न, त्यासाठी मोठे सॉफ्टवेअरचा वापर होत असल्याचा इतकेच नाही तर कॉल सेंटरमधून ही प्रक्रिया राबवण्यात आल्याचा गंभीर आरोप केला. मत चोरी प्रकरणात मी जो काही दावा करत आहे. तो मोठ्या जबाबदारीने करत आहे. माझ्याकडे भक्कम पुरावे असल्याचा दावा त्यांनी केला. इतकेच नाही तर यावेळी त्यांनी काही मतदारांना सुद्धा मंचावर उभं करत पान 3 वर

# आज ठळक

## आता मराठ्यांचं वादळ दिल्लीत धडकणार, जरांगे पाटलांची थेट घोषणा




मराठा समाजाला आरक्षण मिळावं यासाठी मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मोठा लढा उभारला, त्यांच्या मुंबईतील आंदोलनाला मोठ यश आलं आहे, त्यांच्या मुंबईतील आंदोलनानंतर राज्यात सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करण्यासंदर्भातील जीआर काढला आहे. हा मराठा समाजाचा मोठा विजय मानला जात आहे, राज्यात लवकरच सातारा गॅझेट देखील लागू होण्याची शक्यता आहे.याच दरम्यान आता मनोज जरांगे पाटील यांनी मोठी घोषणा केली आहे, मराठ्यांचं वादळ आता दिल्लीमध्ये धडकणार आहे. मनोज जरांगे पाटील यांनी चलो दिल्लीचा नारा दिला आहे. देशभरातील मराठा समाजाचे ते दिल्लीमध्ये अधिवेशन घेणार आहेत. लवकरच अधिवेशनाची तारीख जाहीर होणार आहे. हैदराबाद गॅझेट, सातारा गॅझेटच्या अंमलबजावणी नंतर दिल्लीमध्ये मराठा समाजाचं अधिवेशन होणार आहे. धाराशिवमध्ये हैदराबाद गॅझेट लागू करण्यासंदर्भात झालेल्या बैठकीमध्ये मनोज जरांगे पाटील यांनी ही घोषणा केली आहे.मराठा समाजाला आरक्षण पान 3 वर

# ना. पंकजाताई मुंडे यांनी वांगदरीत जाऊन केले भरत कराड यांच्या कुटुंबियांचे सांत्वन

## आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल कुणीही उचलू नका





लातूर ।दिनांक 18। राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी ओबीसी आरक्षण धोक्यात असल्याच्या निराशेपोटी आत्महत्या केलेल्या भरत महादेव कराड यांच्या कुटुंबाची आज वांगदरी येथे जाऊन भेट घेतली. दुःखाचा डोंगर कोसळलेल्या कराड कुटुंबीयांच सांत्वन करत पंकजाताई मुंडे यांनी त्यांना धीर दिला.

ओबीसी आरक्षण धोक्यात असल्याच्या निराशेपोटी भरत महादेव कराड यांनी काही दिवसापूर्वी मांजरा नदीत उडी मारून आत्महत्या केली होती. दरम्यान भरत यांच्या पान 3 वर

# आदल्या रात्रीच ठरला प्लान, आंतरवालीतील दगडफेकीवर भुजबळांचा

## सर्वात मोठा गौप्यस्फोट



मराठा समाजाला आरक्षण मिळावं यासाठी आंतरवाली सराटीमध्ये आंदोलन सुरु होतं, या आंदोलनादरम्यान मोठा राडा झाला होता, यावेळी पोलिसांवर देखील दगडफेक झाल्याचा आरोप करण्यात आला होता. यावर बोलताना आता ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे. त्यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत.आतरवली सराटीत 83 पोलिसांवर दगडफेक झाली. त्यांचा प्लान आदल्या रात्रीच ठरला होता. त्यावेळेस पवार साहेबांचा पान 3 वर

# भारताचे लाडके व लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त 'सेवा पंधरवडा' उपक्रमा विविध कार्यक्रमाचे आयोजन

## » ना.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते होणार उद्घाटन ; नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा - भाजपा तालुकाध्यक्ष राजेश गित्ते




परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :- भारताचे लाडके व लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 75 व्या वाढदिवसानिमित्त 'सेवा पंधरवडा' उपक्रमा अंतर्गत आरोग्य तपासणी शिबिर, नेत्ररोग तपासणी, रक्तदान शिबिराचे उद्घाटन पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या शुभहस्ते दि 19 सप्टेंबर रोजी परळी



उपजिल्हा पान 3 वर

# पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्ताने होणाऱ्या मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा

## सौ उमाताई समशेट्टे



परळी वैजनाथ भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 75 व्या वाढदिवसानिमित्त 'सेवा पंधरवडा' उपक्रमा अंतर्गत परळी वैजनाथ उपजिल्हा रुग्णालयात मोफत आरोग्य व नेत्ररोग तपासणी शिबिराचा गरजू नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन भाजपा शहराध्यक्षा सौ उमाताई समशेट्टे यांनी केले आहे.

भारताचे कणखर व लोकप्रिय पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी याांच्या नेतृत्त्वाखाली गरीब व वांचित घटकाांच्या उन्नतीसाठी व सेवाभावी कार्य करण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने देशभर 'सेवा पंधरवडा 2025' अयोजिय करण्यात आला आहे. या अंतर्गत परळी उपजिल्हा पान 3 वर



# पिके उद्ध्वस्त शेतकरी हवालदिल; ओबीसी नेते प्रा.टी.पी.मुंडे यांचा गावोगाव दौरा!





परळी (प्रतिनिधी) : परळी तालुक्यात झालेल्या सततच्या मुसळधार पावसामुळे खरीप हंगाम कोलमडून पडला आहे. सोयाबीन, कापूस, तूर, उडीद मुग ऊस इत्यादीसह अनेक पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेतकरी हवालदिल झाले आहेत. पावसाचे पाणी घरात शिरून घरांची पडझड होऊन संसार उपयोगी साहित्य नष्ट झाले आहे. राक्षस वाडी येथील तलाव फुटल्याने शेतकऱ्याची जमीन पूर्णतः खचली आहे. नदीकाठच्या गावातील जमिनीची अशीच परिस्थिती आहे.शेतकरी बांधवांच्या या दुःखात सहभागी होत ओबीसी नेते प्रा. टी.पी. मुंडे यांनी चिखल तुडवत गावोगाव दौरा करून नुकसानीची पाहणी केली.

परळी तालुक्यात गावोगाव संवाद प्रा. मुंडे यांनी पान 3 वर

# मनसेसोबतच्या युतीचा निर्णय लवकरच; शाखा प्रमुखांच्या बैठकीमध्ये उद्धव ठाकरेंनी सांगितलं?



गेल्या अनेक दिवसांपासून शिवसेना ठाकरे गट आणि मनसेची युती होणार असल्याची चर्चा सुरु आहे. वरळीमध्ये पार पडलेल्या विजयी मेळाव्यात वीस वर्षांनंतर पहिल्यांदाच दोन्ही ठाकरे बंधू एकाच व्यासपीठावर आले, त्यानंतर युतीच्या चर्चेनं जोर पकडला. दरम्यान त्यानंतर मनसे प्रमुख राज ठाकरे देखील शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी मातोश्रीवर गेले पान 3 वर

# सौ. शोभाबाई विजयकुमार मराठे यांचे निधन



परळी (प्रतिनिधी) – परळी शहरातील विधीतज्ज्ञ ॲड. प्रकाश मराठे यांचे मोठे बंधू विजयकुमार मराठे यांच्या पत्नी व सचिन मराठे यांच्या मातोश्री सौ. शोभाबाई विजयकुमार मराठे (वय 80) यांचे बुधवार दि. 16 सप्टेंबर रोजी मध्यरात्री 1 वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठे कुटुंबियांवर शोककळा पसरली असून, परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

कै. शोभाबाई या अत्यंत मनमिळाऊ, धार्मिक वृत्तीच्या आणि सर्वांना आपलेपणाने जपणाऱ्या महिला होत्या. आयुष्यभर कुटुंबातील सर्व सदस्यांना आधार देत त्यांनी आपल्या सुस्वभावी वर्तणुकीने आपले वेगळे स्थान निर्माण केले होते. त्यांच्या निधनाने कुटुंबावर तसेच नातेवाईक, परिचित व समाजमंडळींवर मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

त्यांच्या पार्थिवावर परळी येथील स्मशानभूमीत गुरुवार दि. 18 सप्टेंबर रोजी सकाळी 11 वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अंत्ययात्रेला नातेवाईक, मित्रपरिवार, शेजारी, समाजबांधव यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दिवंगत आत्म्यास श्रद्धांजली वाहिली.कै. शोभाबाई यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, दीर, पुतणे, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.मराठे परिवाराच्या दुःखात दै परळी संघर्षनेता परिवार सहभागी आहे.

# बौद्ध महासभेचा आक्रोश मोर्चा




बीड;महाविहार महाबोधी दिक्षाभूमी मुक्तीसाठी बौद्ध महासभेच्या वतीने आज जिल्हाधिकारी कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चामध्ये मोठ्या संख्येने अनुयायांची उपस्थिती होती. हा मोर्चा डॉ.बाबासाहे आंबेडकर पुतळ्यापासून काढण्यात आला होता. दिक्षाभूमी मुक्तीसाठी ीड जिल्हाधिकारी कार्यालयावर आज सकाळी भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. सदरील या पान 3 वर

# शेतीशी निगडीत विविध प्रश्नांवर मयंक गांधी यांचा शेतकऱ्यांशी संवाद

## बोधेगाव येथे आज ग्राम विकास मंथन कार्यक्रमाचे आयोजन





परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

परळी तालुक्यात अतिवृष्टी होऊन शेकडो शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. नद्या, नाले, ओढे तुडुंब भरून वाहिल्याने काही पाणी प्रकल्प, बंधारे वाहून गेले आहेत. नुकसान झालेला शेतकरी खचला आहे, नैराश्याच्या गर्तेत जाण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यांच्यात नवी उमेद जागावी, शेतकऱ्यांना दिलासा मिळावा तसेच शेतकऱ्यांचे नेमके प्रश्न व त्यावरील उपाय यावर सार्वजनिक चर्चा झाली पाहिजे. यासाठीच आज शुक्रवार दिनांक 19 सप्टेंबर रोजी सकाळी 8.30 वाजता बोधेगाव येथे "ग्राम विकास मंथन" कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी, नामांकित उद्योजक तथा समाजसेवक रमण सर, डॉ.हरिश्चंद्र वंगे, सेवानिवृत्त नायब तहसीलदार बाबुरव रुपणर यांची उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमास पान 3 वर

# राजकारणी कधी खरं बोलतात?

लोकशाहीत राजकारण्यांचे शब्द हे केवळ भाषण नाहीत, तर जनतेच्या विश्वासाचा पाया असतात. कारण मतदार आश्वासनांवरच मतदानाचा निर्णय घेतो. पण सत्तेच्या रंगमंचावर हे शब्द किती टिकतात? अंजली दमानिया यांनी अलीकडेच सोशल मीडियावर शेअर केलेले व्हिडिओ आणि त्यावर केलेली टिप्पणी या प्रश्नाला पुन्हा अधोरेखित करतात.

या व्हिडिओंमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी सिंचन घोटाळ्याचा उल्लेख करत म्हणतात, “एनसीपीवर सत्तर हजार कोटींच्या घोटाळ्याचा आरोप आहे... भ्रष्टाचाराला मी कधीच पाठिशी घालणार नाही.” त्याचप्रमाणे देवेंद्र फडणवीस यांनीदेखील अजित पवारांवर थेट हल्ला चढवला होता. हे सर्व लोकांनी टाळ्यांच्या गजरात ऐकलं होतं. परंतु काही वर्षांनी परिस्थिती बदलली. अजित पवार यांचा शपथविधी सोहळा झाला तेव्हा हेच नेते हसतमुखाने उपस्थित होते. कालपर्यंत ज्यांना भ्रष्टाचाराचे प्रतीक ठरवले, त्यांच्यासोबत आज सत्ता वाटली जाते.

हा विरोधाभास नेहमीच राजकारणात दिसतो. शत्रू मित्र होतात, मित्र शत्रू होतात. परंतु या फेरबदलात जनतेचा विश्वास डळमळतो. निवडणुकीच्या प्रचारात दिलेली ठाम आश्वासने नंतर ‘सोयीस्कर विस्मरणा’त जातात. अशा वेळी मतदारांच्या मनात स्वाभाविकच प्रश्न निर्माण होतो – “राजकारणी खरं बोलतात तरी का?”

भारतीय राजकारणाचा इतिहास अशा विसंगतींनी भरलेला आहे. 1977 मध्ये ‘भ्रष्टाचाराविरोधी लढाई’ म्हणून उभ्या राहिलेल्या जनता पक्षात काही वर्षांतच परस्परविरोधी नेते एकत्र आले. अलीकडे बिहार आणि उत्तर प्रदेशात कट्टर विरोधकांनीही सत्तेसाठी हातमिळवणी केली. आंतरराष्ट्रीय पातळीवर पाहिले तरी अमेरिकेत ट्रम्प यांचे रिपब्लिकन किंवा ब्रिटनमध्ये कंझर्व्हेटिव्ह नेते — सत्तेसाठी तत्त्वांना दुय्यम स्थान देतात. त्यामुळे ही विसंगती केवळ भारतापुरती मर्यादित नाही; पण लोकशाहीसाठी ती कुठेही घातक आहे.

लोकशाही टिकून राहते ती नागरिकांच्या विश्वासावर. जर मतदारांना सतत असं वाटलं की राजकारणी केवळ निवडणुकीपुरते बोलतात, तर मतदानाविषयीचा उत्साह घटतो. आकडेवारी सांगते की गेल्या दशकात शहरी मतदारांचा मतदानाचा टक्का काही ठिकाणी 50 टक्क्यांखाली गेला आहे. हे केवळ उदासीनतेचं नाही, तर अविश्वासाचं लक्षण आहे.

माहितीच्या युगात राजकारण्यांना विस्मरण परवडत नाही. जुनी भाषणं, जाहीरनामे, मुलाखती – सगळं सोशल मीडियावर उपलब्ध आहे. एखाद्या नेत्याने काल केलेले वक्तव्य आणि आजचा त्याचा निर्णय यामधील फरक जनता लगेच उघड करते. त्यामुळे तात्पुरत्या आघाड्या सत्तेत उपयुक्त ठरल्या तरी दीर्घकाळात त्या विश्वासघाताच्या प्रतीक म्हणून लक्षात राहतात.

अंजली दमानिया यांनी मांडलेला मुद्दा फक्त एका पक्षापुरता मर्यादित नाही. हा प्रश्न संपूर्ण व्यवस्थेचा आहे. मीडिया, नागरी समाज आणि मतदार यांच्यावरही जबाबदारी आहे. राजकारण्यांना सातत्याने प्रश्न विचारले नाहीत, तर त्यांची वचनभंगाची परंपरा सुरूच राहील. लोकशाही ही केवळ निवडणूक जिंकण्याची यंत्रणा नाही, तर तत्त्वनिष्ठ शासनाची संकल्पना आहे.

राजकारणात समीकरणे बदलतात, हे सत्य आहे. पण या बदलांमध्ये तत्त्वे पूर्णपणे विसरली गेली तर लोकशाहीची ताकद कमकुवत होते. मोदी आणि फडणवीस यांची जुनी भाषणं आणि आजचे व्यवहार यातील विरोधाभास हा केवळ व्यक्तिसापेक्ष मुद्दा नाही; तो भारतीय लोकशाहीसमोर उभ्या राहिलेल्या विश्वाससंकटाचा पुरावा आहे. जनता आता स्मरणशक्ती गमावणारी नाही. त्यामुळे राजकारण्यांनी सोयीस्कर विस्मरणाचा खेळ थांबवून सत्याशी प्रामाणिक राहणे हीच काळाची गरज आहे.

**डॉ. भारत कऱ्हाड**

# आमचे दोन अनमोल रत्न



2019चे ते वर्षे मुलगा शशांकने 16 एप्रिल 2019 मंगळवार रोजी, एक छोटीशी परी घरी आली आणि तिच्या जादूने आमच्या घरातील वातावरण अगदी आनंदी, प्रेमळ झालं. तिचे नाव ग्रेसी! परंतू आमच्यासाठी ग्रेसी परिवारातील परी होती,लाडो होती. आणले तेव्हा ती साडेचार महिन्याची होती रात्रीची वेळ अतिशय शांत गोंडस आमच्या कुटुंबातील (परिवाराची )ती सदस्य बनली. घरातील आमच्या वागण्यावर, बोलण्यावर, सवयीनवर, आणि शिस्तीचे बारकाईने निरीक्षण करू लागली. आनंदाने ती घरात वावरू लागली.प्राणी म्हणून नाही,एक माणूस म्हणून आमचं कुटुंब तिचे संगोपन लहानपणापासूनच करू लागले. घरातील वातावरण अगदी मोकडे, गळ्यात कधीच बंधन युक्त बेल्ट घातला नाही .

ग्रीसी तीन वर्षाची झाली. तिला गोंडस गुबगुबीत अशी 07 बाळ झाली. त्यातील दोन मृत अवस्थेत होती. व पाच बाळ व्यवस्थित जगली. त्यांचे नाव वजीर, प्रिन्स, टायगर, किंग, कालू .त्यापैकी ‘टायगर’ जन्मापासून आमच्या परिवारात लहानाचा मोठा होत गेला .ग्रेसीची मायेची सावली आणि प्रेमही त्याला जवळून मिळत होते. खूप छान ,सुंदर, गुबगुबीत, सामंजस्य ,शांत ,नजरेने सर्व गोष्टींची दखल घेणारा,हुशार, आवाज दिल्यावर आदेशाचे पालन करणारा ,आमच्या टायगरला तो श्वान आहे. हे कधीच आम्ही समजलं नाही. तो आमचा परिवारातील एक सदस्य होता. त्या पद्धतीनेच त्याच्याशी आम्ही वागत होतो. टायगर तसा फारच प्रमाणापेक्षा हुशार! लहानपणी माझी पत्नी संगीता ही टायगरला अंगाई गीत गाऊन मांडीवर त्याला झोप येई पर्यंत हाताच्या मायेच्या स्पर्शाने झोपवत असत.तसंच इतरांची झोपवत असत.

*टायगरची* आई ग्रेसीचे

दिनांक 16जून2024 रविवारी एका पशुवैद्यकीय (डॉक्टर) कडून शस्त्रक्रिया करत असताना ग्रेसीचा मृत्यू झाला .डॉक्टरांनी आपली चूक मान्य केली. परंतु आमच्या परिवारावर दुःखाचा डोंगरच कोसळला. कारण टायगर तेव्हा साडेतीन वर्षाचा ! तो जन्मल्यापासून ग्रेसीला एक मिनिटही सोडून राहिला नव्हता. त्याचे आईचे छत्र हरपले आईचे प्रेम, माया, जिव्हाळा ,लाड, आपुलकी , त्याच्या बरोबर खेळणं बाळगणं, याचे वलय त्याच्यासाठी सर्व संपले होते. म्हणून तो सहा महिन्यापर्यंत ग्रेसीच्या आठवणीत नाराज राहत असत. त्याच्या चेहऱ्यावर तसे जाणवत होते. रात्री अधून- मधून रडत असायचा. या सर्व त्याच्या हालचालींचे आणि त्याच्या तब्येतीवर होत असणाऱ्या परिणामाचे मी व माझी पत्नी संगीता अतिशय बारकाईने लक्ष देत होतो. वेळीच टायगरच्या डॉक्टरांचा सल्ला घेत होतो. ग्रेसी गेल्यावर टायगरला आईची उणीव भासत होती. परंतु आम्ही दोघांनी त्याला ग्रेसी प्रमाणेच मायेचा ओलावा निर्माण करून दिला. व तो छानपैकी खेळायला लागला .ग्रेसी गेल्यानंतर तो आमच्या कुशीतच पलंगावर झोपत असत.

प्राणी माणसाच्या मनात भावनिक जागा निर्माण केलेली असते. कुटुंबातील सदस्य तो बनलेला असतो. म्हणून आपण त्यांच्यावर जीवापाड प्रेम करत असतो. मला व माझ्या पत्नीला टायगर चे मालक होण्यापेक्षा पालक व्हायला आवडले. म्हणून त्याचा वाढदिवस साजरा करणे, मुलाप्रमाणे दैनंदिन विधी ,आंघोळ ,या सर्व गोष्टींची काळजी घेणे, त्याला फिरायला नेणे,वेळेवर जेवण देने, त्याच्याबरोबर घरात वावरणे, तसं एक प्रकारे आम्ही त्याचे पालकत्व स्वीकारले होते. ग्रेसी आणि टायगर यांच्यामधील एक माणूस म्हणून आमच्यातील नाते हे घट्ट करण्याचा सुंदर पर्याय होता. आणि त्यामुळे श्वान आणि पालक दोघांनाही भावनिक आधार मिळत असतो.

मी व माझी पत्नी व मुलाने जवळजवळ सहा साडेसहा वर्ष ग्रेसी टायगरच्या जवळून बारकाईने अभ्यास केलेला आहे .नक्कीच माणसांपेक्षा त्यांच्यातले असणारे गुण हे कौतुकास्पद आहे. हुशार होते. कशाचीही तमा न करता इतका प्रामाणिकपणे घराची कुटुंब परिवारातील माणसाची निस्वार्थपणे सेवा करत असतो. तसं माणसाचं नाही ,’माणूस स्वार्थी आहे’. प्राणी आणि माणसातला फरक दिसून आला.

आमच्या टायगर व ग्रेसी घरात कोणीही अनोळखी व आपल्या रोजच्या आवडीचे माणसं दिसली ,आली .की त्यांच्या पायाजवळ जाऊन बसायचे आणि आपलं मस्तक व पंज्याने स्वागत करत असत व माझ्याजवळ किंवा पत्नीकडे बलून खेळण्यासाठी मागत असायचे कारण आलेल्या व्यक्तीला त्यांना ते दाखवायचं असतं की आम्ही बघा कसे बलुन खेळतो. ह्या त्यांच्या आठवणीने रोजच गहिवरून येतं.

25 में2025 रविवारचा तो दिवस आमच्यासाठी काळा दिवस ठरला! मी व माझी पत्नी संगीता आणि टायगर, आम्ही गावी प्रवासाला निघालो होतो . प्रवासात नाशिक जवळील आडगाव या ठिकाणी टायगरची चार वाजून दोन मिनिटांनी जीवन ज्योत मालवली. ग्रेसीच्या मृत्यूनंतर अवघ्या 11 महिने 09 दिवसांनी *टायगर* हे जग सोडून निघून गेला. टायगरने त्याआधी आम्हास अनेक संकेत दिले. गाडी थांबली की तो गाडीत बसत नव्हता, त्याने उलटी केली. घाटणदेवीच्या मंदिराजवळ आम्ही खाली उतरलो. तेव्हा टायगर ड्रायव्हर सीट जवळ म्हणजे माझ्याजवळ आला. तसा तो माझ्या पत्नी जवळ मागच्या सीटर बसलेला असायचा. पुढे आल्यावर त्याने गाडीच्या गिअरवर आपली मान ठेवली. व गाडी चालवू नाका असाच तो

संकेत देत असावा असे नंतर वाटू लागले .टायगर गेल्याच्या दहा मिनिटा आधी त्याने एका हिरवळ जागेवर घेऊन गेला मी तिथे असलेल्या एका दगडावर बसलो. त्या ठिकाणी माझ्यावर इतके प्रेम केले सर्व शरीर चाळून टाकले, तोंडाचे सतत चुंबन घेत राहिला ,सर्व शरीर गोल फिरवून जीभेने चाटत होता. ही क्रिया सात ते दहा मिनिटं त्याची चालू राहिली होती.पुढे जाण्यासाठी कसाबसा त्याला गाडीत घेतले. तशी त्याची इच्छा नव्हती! गाडी सुरु केली पुढच्या प्रवासाला लागलो पत्नी संगीता मागच्या सीटवर टायगरला घेऊन बसली होती. अवघ्या दहा मिनिटे गाडी पुढे गेली आणि संगीताचे लक्षात आले .अहो गाडी बाजूला घेऊन थांबवा! आपल्याला अंबुलन्स बोलावे लागेल. कारण टायगरची जीभ जांभळी झालेलीअसे लक्षात आले. तात्काळ गाडी बाजूला घेतली टायगर आम्ही खाली उतरलो तेव्हा आम्हाला आमच्या बबुने,सोनुने,नानुने(टायगरने) तीन आवाज दिले.एका ढाब्याजवळ गाडी थांबवली होती टायगरची ही अचानक झालेली अवस्था पाहून आम्ही खूप घाबरलो जोराचा हंबरडा फोडला,रडू कोसळले माझी व पत्नीची अवस्था फार वाईट झाली.असं झालं कसं ? काहीच समजत नव्हतं त्याच ठिकाणी ओझर एअर फोर्स मधील इंजिनियर चे विद्यार्थी त्या ठिकाणी आमची अवस्था पाहून त्यांनी खूप मदत केली आम्ही तुमच्या मुलाप्रमाणे आहोत काही घाबरू नका. आम्ही तुम्हा सर्व मदत करतो त्यात ओमकार पाटील, दर्शन निखाडे आणि रोशनी यांनी खूप मदत केली. दवाखाना शोधला एक किलोमीटर अंतरावर दवाखाना होता दवाखान्यात जात असताना टायगरला वाचवण्याचा प्रयत्न करत असतानाच गाडीतच टायगरने माझी पत्नी संगीताच्या मांडीवर टायगरची प्राणज्योत मालवली होती. हे तिच्या लक्षात आले होते. तरीही दवाखान्यात सलाईन लावली. पण सलाईनचा ड्रॉप (थेंब )स्थिर होता. आणि टायगर शांत चीर निद्रेत झोपी गेला होता. माझ्या टायगरचे हे क्षण मी स्वतः मृत्यूशयाला जाईपर्यंत कधीच विसरणार नाही!

या क्षणी दीपक मोरे यांची मोलाची साथ मिळाली .

टायगरच्या डॉक्टरांना फोन केला व विचारले सर्व हकीगत सांगितली आणि आमचा टायगर उष्माघाताचा शिकार होऊन (Heat Stroke) ने आम्हाला हे जग सोडून निघून गेला .माझी पत्नी संगीता त्याला लाडाने माझा सोनू ,माझा नानू ,माझा बबू या नावाने बोलावत असत. त्यालाही वाटत होते हे सगळे नाव माझीच! दुसरी कोणाचीच नाही!

ग्रेसीला जाऊन एक वर्ष तर टायगरला जाऊन चार महिने झाली. असली तरी एकही दिवस त्यांच्या आणि त्यांच्या आठवणी शिवाय जात नाही रोजच त्यांच्या गोड खेळण्याच्या, चालण्याच्या, वागण्याच्या, समजदारपणाच्या आठवणीने डोळे पानावत असतात जरी आम्ही त्याचे पालन पोषण केले असले तरी त्यांनी आमच्यापेक्षा चार पटीने आम्हाला टायगर व ग्रेसीने आनंदी ठेवले होते. दहा लोक घरात वावरल्यासारखे वाटत होते. आता मात्र आम्ही दोघेही ग्रेसी, टायगर च्या आठवणीने समाधानी असणार आहोत. ते गेले असले तरी आमच्या घरात त्यांचे शरीर आहे .

काही माणसं आजकाल श्वानाचा तिटकारा करतात ,घृणास्पद वागतात, त्यांच्या द्वेष करतात,



अशी काही माणसं जेव्हा माणसे ओळखत नाही तेव्हा त्यांना त्या मुक्या प्राण्यांचे प्रेम काय कळणार! कारण त्यांनी कधी त्यांच्या पाठीवर हात फिरवून पाहिलेला नसतो, बिस्किटाच्या तुकडा त्यांना भरवलेला नसतो, कधी मायेची ऊब त्यांना दिलेली नसते, प्रेम ,माया, जिव्हाळा याचे वलय प्राण्यांच्या बाबतीत ज्या माणसात नसेल त्याला मुक्या प्राण्यांचे सच्चे प्रेम आणि इमानिवृत्ती काय कळणार!

ग्रेसी, टायगरवर जीवापाड प्रेम करणारे दिपक,हर्षल,भूषण ,आरव, विनीत,अमित,प्रतिष्ठा, प्रिया,सौरभ तसेच हॅप्पी गॅलेक्सी फॅमिली कुटुंब कुणाचाही वाढदिवस असला की ग्रेसी, टायगरसाठी आधी त्यांना केक दिला जात होता .इतके प्रेम होते या सगळ्यांचे!

ग्रेसी,टायगर दोघेही रविवारीच गेलेत ,तर दोघांची मृत्यू दिनांकाची बेरीज 21 येते.

1+6+6+2+0+2+4=21(ग्रेसी)

2+5+5+2+0+2+5=21(टायगर)हा योगायोग असावा का? मला येथे अंधश्रद्धेला वाव द्यायचं हेतू नाही.

प्रिय ग्रेसी बबी व टायगर बबू, सोनू,नानू . तुम्ही आम्हास सोडून गेलात असलात तरी तुमचे प्रेम,निष्ठा, मैत्री, खेडकर स्वभाव,चंचलता, आज्ञाधारक, उत्साहीपणा यांच्या आठवणी नेहमीच प्रेरणा देत राहतील हृदयात राहतील कारण तुम्ही आमच्या जीवनातील अद्भूत भेट होतात.घरात आनंद,प्रेम आणत होते.एक महत्त्वाचा स्त्रोत आणि मानसिक आधार होतात. आपणास मम्मा, बाबा,विकीदादा कडून खूप-खूप कृतज्ञता व्यक्त करतो.



**डॉ.शिवदास कांबळे**
**(कल्याण)**
**लेखक- राज्यस्तरीय आदर्श प्राणी संगोपन माणसातला देव पुरस्काराने सन्मानित आहे.**

# शेतकऱ्यांना नुकसानभरपाई व असंघटित कामगारांना सानुग्रह अनुदान द्या”



परळी वैजनाथ प्रतिनिधी या सप्टेंबर महिन्यात झालेल्या अवकाळी पावसाने बीड जिल्ह्यात हाहाकार माजवला. शेतकऱ्यांचे पिके वाहून गेली, मजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या असंघटित कामगारांचे हातचे रोजगार हिरावले. शेतकरी कर्जबाजारी झाले, तर रोजंदारीवर पोट भरणाऱ्या बांधकाम व इतर असंघटित मजुरांवर उपासमारीची वेळ आली. गावोगावी निराशा आणि हतबलता दिसून येते आहे.

अशा कठीण परिस्थितीत प्रशासनाने कागदोपत्री प्रक्रियेत वेळ घालवू नये. पंचनामे तातडीने करून शेतकऱ्यांना योग्य ती नुकसानभरपाई मिळाली पाहिजे. त्याचप्रमाणे शहरात व ग्रामीण भागात काम करणाऱ्या असंघटित बांधकाम कामगारांना दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सानुग्रह अनुदानाची गरज आहे. कारण दिवाळीसारख्या सणाच्या काळात समाजातील शेवटच्या घटकाला मदतीचा हात मिळाला, तरच खरी दिवाळी उजळून निघेल. म्हणून

सामाजिक कार्यकर्ते जमीर शेख यांनी मागणी केवळ एका वर्गासाठी नसून संपूर्ण समाजातील दुर्बल घटकांच्या जगण्याचा प्रश्न आहे. शेतकरी हा अन्नदाता आहे आणि असंघटित कामगार हा श्रमदाता आहे. या दोन्ही घटकांच्या श्रमावरच देशाचा पाया उभा आहे. त्यामुळे त्यांना संकटात मदत करणे ही शासनाची प्राथमिक जबाबदारी ठरते.

आज आवश्यक आहे ती केवळ घोषणा नव्हे, तर प्रत्यक्ष कृती. पावसाने उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या डोळ्यात आशेचा किरण दिसावा, कामगारांच्या कुटुंबांना सणासुदीच्या काळात आनंदाची झुळूक मिळावी, यासाठी शासनाने तातडीने पावले उचलली पाहिजेत. समाजाची खरी ताकद या कष्टकरी वर्गात आहे. त्यांचे हात बळकट झाले, तरच आपली दिवाळी खऱ्या अर्थाने प्रकाशमय ठरेल. अशी मागणी समाज कार्यकर्ता जमीर शेख यांनी पत्रकार प्रसिद्धीच्या माध्यमातून शेतकरी आणि असंघटित कामगारांसाठी केली आहे.

# मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन : इतिहास आणि महत्त्व

**डॉ. भारत कऱ्हाड**

भारताला 15 ऑगस्ट 1947 रोजी ब्रिटिश सत्तेतून स्वातंत्र्य मिळाले. मात्र, त्या वेळी देशात सुमारे 565 संस्थाने अस्तित्वात होती. त्यापैकी बहुतांश संस्थानांनी भारतीय संघराज्यात विलीन होण्याची संमती दिली. परंतु हैदराबाद, जम्मू-काश्मीर आणि जुनागढ ही तीन महत्त्वाची संस्थाने सुरुवातीला स्वतंत्र भारतात सामील झाली नाहीत. यापैकी हैदराबाद संस्थान हा सर्वात मोठा भाग होता. 17 सप्टेंबर 1948 रोजी भारतीय सैन्याच्या कारवाईनंतर आणि स्वातंत्र्यसैनिकांच्या लढ्यामुळे हैदराबाद संस्थानाचा पराभव झाला. परिणामी मराठवाडा भारतात सामील झाला. हा दिवसच आज मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन म्हणून साजरा केला जातो.

हैदराबाद संस्थानाची स्थिती:

हैदराबाद संस्थानावर निजाम मीर उस्मान अली खान यांचे शासन होते. सुमारे सहा पिढ्यांपासून निजाम वंशाचे राज्य या संस्थानात चालू होते. संस्थानाची लोकसंख्या सुमारे 1 कोटी 60 लाख होती, ज्यात आजचा तेलंगणा, मराठवाडा आणि कर्नाटकचा काही भाग सामाविष्ट होता. निजामशाहीचे प्रशासन स्वेच्छाचारी पद्धतीचे होते. संस्थानातील सर्वसामान्य जनता दडपणाखाली जगत होती.

मुक्तिसंग्रामाची सुरुवात:

भारतात सामील होण्यासाठी स्वातंत्र्यसैनिकांनी आंदोलनाची सुरुवात केली. स्वामी रामानंद तीर्थ हे या संग्रामाचे प्रमुख नेते होते. त्यांच्यासोबत दिंगबरराव बिंदू, गोविंदभाई श्रॉफ, रविनारायण रेड्डी, देवीसिंग चौहान, भाऊसाहेब वैशंपायन, शंकरसिंग नाईक, विजयेंद्र काबरा, बाबासाहेब परांजपे आदींनी महत्त्वाची भूमिका बजावली.

निजामच्या सेनापती कासीम रझवीने मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन या संघटनेच्या माध्यमातून रझाकार सेनेची स्थापना केली. रझाकारांनी मराठवाडा व हैदराबादमध्ये दहशत निर्माण केली. सर्वसामान्यांवर अमानुष अत्याचार झाले. या परिस्थितीत स्वातंत्र्यसैनिकांनी निजामशाहीविरुद्ध सशस्त्र लढ्याचा मार्ग स्वीकारला.

स्थानिक वीरांचे योगदान:

मराठवाड्याच्या कानाकोपऱ्यात हा लढा तेजस्वीपणे लढला गेला.

काशीनाथ कुलकर्णी यांनी निजामच्या पंतप्रधानाचा प्रवास रोखण्यासाठी पूल उडवून दिला.

भूम येथील गणपतराव क्षीरसागर यांनी शस्त्रास्त्रे तयार करून पुरवली.

दगडाबाई शेळके या “मराठवाड्याच्या राणी लक्ष्मीबाई” म्हणून ओळखल्या गेल्या.

विठ्ठलराव काटकर, हरिश्चंद्रजी जाधव, धोंडिबा शंकर सिरसाट, जनार्दन होर्टीकर, सूर्यभान पवार, मारोतराव पौळ, देवराव कांबळे, जीवनराव बोधनकर आदी स्वातंत्र्यसैनिकांनी स्थानिक पातळीवर शौर्य दाखवले.

यात अनेकांनी हौतात्म्य पत्करले. वैजापूर तालुक्यातील रामचंद्र धंदेवार हे शहीद झाले. त्यांच्या बलिदानामुळे स्वातंत्र्यलढ्याला अधिक जोम आला.

विस्मृतीत गेलेले स्थानिक वीर:

इतिहासाच्या नोंदींमध्ये बहुतांश वेळा मोठ्या नेत्यांची व स्वातंत्र्यसैनिकांची नावे आढळतात. मात्र, गावागावातील सामान्य लोकांनीदेखील आपल्या जीवाची पर्वा न करता योगदान दिले. त्यांची नावे विस्मरणात गेली आहेत.

गंगाराम नागोराव ढाकणे (अहमदपूर तालुका) यांनी निजामाच्या सैन्याच्या तावडीतून गोरगरिबांची सुटका करण्यासाठी त्यांना लपवून ठेवले, उपाशी राहू नयेत म्हणून त्यांना अन्न दिले.

भीमराव केंद्रे, राजाराम फड, तुकाराम अंबाजी मुंडे, पिराजी चव्हाण, श्रीपती चव्हाण, पंढरीनाथ जयवंत मुंडे, (उस्मानाबाद जिल्ह्यातील) यांनी अशाच पद्धतीने गावकऱ्यांना आसरा व मदत करून लोकांचे प्राण वाचवले.

अशा अज्ञात वीरांचे योगदान तितकेच महत्त्वाचे होते. हे लोक शस्त्र घेऊन लढले नाहीत, परंतु त्यांनी मानवतेच्या शक्तीने निजामशाहीविरुद्ध उभे राहून मुक्तिसंग्रामाला बळ दिले.

ऑपरेशन पोलो:

भारतीय सरकारने परिस्थिती हाताळण्यासाठी ऑपरेशन पोलो नावाची लष्करी कारवाई केली. तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या आदेशानुसार 11 सप्टेंबर 1948 रोजी मेजर जनरल जे. एन. चौधरी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय सैन्याने हैदराबाद संस्थानावर हल्ला चढवला.

या कारवाईत भारतीय सैन्याने सोलापूर, परभणी, जालना, वारंगळ, बीदर आदी भागांवर जलदगतीने ताबा मिळवला. रझाकार आणि निजामी सैन्य जास्त काळ टिकू शकले नाहीत. अखेर 17 सप्टेंबर 1948 रोजी निजामशाहीने शरणागती पत्करली आणि हैदराबाद संस्थान भारतात सामील झाले.

ऐतिहासिक महत्त्व:

मराठवाडा मुक्तिसंग्राम हा भारताच्या संघराज्यात्मक एकात्मतेचा महत्त्वपूर्ण टप्पा आहे. या लढ्यातील स्वातंत्र्यसैनिकांनी प्राणार्पण करून मराठवाडा व हैदराबाद मुक्त केले. त्यांच्या बलिदानामुळेच आज आपण स्वातंत्र्याचा आनंद उपभोगत आहोत.

एकुणच, मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन हा केवळ ऐतिहासिक घटना स्मरण करण्याचा दिवस नाही, तर स्वातंत्र्य, त्याग आणि ऐक्य यांचे स्मरण करून देणारा दिवस आहे. विस्मृतीत गेलेल्या स्थानिक वीरांची नावे उजेडात आणणे हीसुद्धा आपल्या पिढीची जबाबदारी आहे. स्वातंत्र्यसैनिकांचे शौर्य आणि सामान्य लोकांचे धैर्य पिढ्यानपिढ्या प्रेरणादायी ठरेल. जय हिंद! जय महाराष्ट्र!

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**



# हनुमंत चौरे शिक्षक यांची बदली झालेने त्यांना निरोप देण्यात आला.

येवताःप्रतिनिधी/(बाबुराव तिडके) दि.18 रोजी केज तालुक्याती जीवाची वाडी येथील जि.प.प्रा.शाळा एडका वस्ती या शाळेतून आज त्यांची बदली झाली असून त्यांनी दि 1 जुलै 2004 ते आज दि. 18 सप्टेंबर 2025 पर्यंत म्हणजे 20-21 वर्ष या जिल्हा परिषद शाळा एडकावस्ती येथे शैक्षणिक कार्य केले, त्यांनी गावातील एक नागरिक सोडून शिक्षक कसा असावा हे त्यांच्या शिक्षक वृतीतून अनेक वेळी आम्ही अनूभवले आहे. असे शिक्षक प्रत्येक शाळेवर असावेत म्हणजे शिक्षण क्षेत्रातील दर्जा उंचावेलआणि विद्यार्थ्यांना शिक्षण क्षेत्रात आवड निर्माण होईल व विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यासाठी योग्य पाया उभारलेला दिसेल...आज हनुमंत चौरे सर यांच्या निरोप समारंभ नाही तर दुःख म्हणावे लागेल.कारण शिक्षक काय असतो हे त्यांनी विद्यार्थ्यांना नाही तर तेथील नागरीकांना देखिल त्याची जाणीव करून दिलीआज आम्ही चांगल्या शिक्षकाला निरोप देतोय हे दुःख आहे पण त्यांनी केलेली कामगिरी हि अतुलनीय आहे.हनुमंत चौरे सर तुम्ही आमच्या मुलांना दिलेली शिक्षण रुपी विद्या त्याबद्दल आम्ही तुमचे ऋणी आहोत.आपले कार्य सदैव विस्मरणीय राहील असे भावनीक उरद्गार एडकावस्ती वरील पालकांनी केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

मुख्याधिकारी कांबळे व अन्य अधिकारी यावेळी उपस्थित होते.

आजचा दिवस परळी मतदारसंघातील अभ्यागतांसाठी राखीव ठेवण्यात आल्यामुळे त्यांना भेटण्यासाठी मतदारसंघातील नागरिक व कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. आलेल्या प्रत्येकांना भेटत, त्यांची गाऱ्हाणी ऐकून घेत त्यांच्या कामाचे पत्र असतील, फोन असतील किंवा वैयक्तिक काम असेल ते त्यांनी जागेवरच सोडविले.

लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या पुण्याईचा वसा अन् वारसा जबाबदारीने पुढे नेण्याची प्रेरणा देणारी ही गर्दी होती. सत्तेतील मंत्रीपदाचा

वापर तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करेल असं त्या यावेळी म्हणाल्या. दरम्यान, परळीचा जनता दरबार आटोपून त्यांनी अंबाजोगाई येथे भाजपचे जिल्हा सरचिटणीस गणेश कराड यांच्या निवासस्थानी केज मतदारसंघातील सामान्य जनतेची गाऱ्हाणी ऐकली व त्यांच्या समस्यांचाही जागेवर निपटारा केला.

---

निवडणूक आयोगासमोर आव्हान उभं केलं.राहुल गांधी म्हणाले की अगोदरच सांगतो की हा काही हायड्रोजन बॉम्ब नाही. हायड्रोजन बॉम्ब लवकरच पडेल. या देशातील तरुणांसमोर ही उदाहरणं समोर आणत आहे. त्यांना मत चोरी कशी करण्यात आली, निवडणुकीत कशी गडबड करण्यात आली हे दाखवण्याचा हा प्रयत्न आहे.कर्नाटकातील अलंद या मतदार संघाचे त्यांनी उदाहरण दिलं. कोणीतरी 6018 मतदारांची नाव वगळली. 2023 मधील निवडणुकीत अलंद या मतदारसंघातून किती मतदार हटवण्यात आले हे आम्हाला माहिती नाही. ही संख्या 6018 पेक्षा अधिक आहे. पण ही नाव हटवताना योगायोगाने काही जण पकडल्या गेले. तिथल्या बुथ लेव्हल अधिकाऱ्याला त्याच्या काकाचे नाव हटविल्याचे लक्षात आले. तेव्हा त्याने त्याचा तपास घेतला. त्याने त्याच्या शेजाऱ्याकडे चौकशी केली. तेव्हा त्याने आपण असा कोणताही अर्ज केला नसल्याचे सांगितले. म्हणजे ज्याने मतदाराचे नाव वगळण्याची मागणी केली आणि ज्याचे मतदार यादीतून नाव गायब झाले त्या दोघांनाही हा प्रकार माहिती नव्हता. कोणत्या तरी बाहेरील शक्तीने ही प्रक्रिया हायजॅक केली आणि मतदारांची नाव यादीतून वगळली.तर विदर्भातील राजुरा विधानसभा मतदार संघात 6850 मतदारांची नाव जोडण्यात आली. त्यांचा काहीच थांगपत्ता नसल्याचे ते म्हणाले. कोणती तरी यंत्रणा, अत्याधुनिक सॉफ्टवेअर वापरुन हा प्रकार करण्यात आल्याचा. त्यासाठी कॉल सेंटरचा वापर झाल्याचा आरोपही त्यांनी केला.भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना हा सर्व प्रकार माहिती आहे. ते वोटचोराना वाचवत असल्याचा गंभीर आरोप राहुल गांधी यांनी केला. या मत चोरट्यांनी भारतीय लोकशाही संपवली आहे. पण एक लहान चूक झाली तरी चोरी पकडली जाते असा दावा त्यांनी केला

---

आत्महत्येनंतर ग्रामस्थांनी उपोषण सुरु केलेले उपोषण पंकजाताईंच्या भेटीनंतर मागे घेण्यात आले.

यावेळी माध्यमाशी बोलताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या, आपल्या लेकरांचं ओबीसी आरक्षण जाणार या नैराश्यातून भरतने आत्महत्या केली, ही खूप वाईट घटना आहे. आज मी त्यांच्या कुटुंबाची भेट घेतली त्याच्या मुलाना कुरवाळलं, त्याच्या पत्नीला धीर दिला. लोकनेते मुंडे साहेब नेहमी म्हणायचे मदत करताना या हाताचं त्या हाताला सांगायचं नाही. म्हणून कराड कुटुंबाला काय देणार, हे सांगणार नाही. मात्र मी या कुटुंबाच्या पाठीशी खंबीर उभी आहे. मी या विषयी विधिमंडळात प्रश्न उपस्थित करणार आहे. इतराना मदत केली तीच मदत कराड कुटुंबीयांना देखील देण्यात यावी, अशी मागणी देखील करण्यार असल्याचे पंकजा मुंडे यांनी सांगितलं.

---

एक आमदार त्या बैठकीत सहभागी होता. शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना वस्तुस्थिती माहीत असतानाही, शरद पवार त्या ठिकाणी गेले, असा मोठा गौप्यस्फोट यावेळी भुजबळ यांनी केला आहे, भुजबळ यांच्या या दाव्यामुळे आता चर्चेला उधाण आलं आहे.दरम्यान यावेळी बोलताना भुजबळ यांनी काही ओबीसी प्रमाणपत्रं देखील दाखवली, ही प्रमाणपत्र खोटी असल्याचा दावा त्यांनी केला आहे, त्यातील एकावर खाडाखोड झालेली होती, तर एकावर 'मराठी कुणबी' असं लिहीलं होतं. खोटी प्रमाणपत्र तपासण्यासाठी समिती नेमा, अशी मागणी त्यांनी यावेळी केली आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले की, शिंदे समितीचं आता काय काम आहे? शपथपत्राच्या आधारे निर्णय घेणं कुठेही मान्य नाही, संविधानात नाही. एका ताटात दोन जण जेवतात. त्यात मध्येच तीन चार घुसले तर काय होईल? असा प्रश्न यावेळी भुजबळ यांनी उपस्थित केला आहे. निवडणूक आली की जरांगे पाटील उभे राहातात, जे -जे जरांगे यांना समर्थन करतील त्यांना निवडणुकीत धडा शिकवा, तुम्ही एकत्र आला तर काहीही अशक्य नाही. मी निवडणुकीला उभं राहीलो. जरांगे पाटील दोन दिवस माझ्या मतदार संघात आले. मराठा मतं गेली. पण ओबीसी, एससी, एसटी, सर्व जाती माझ्या सोबत आल्या, मी जिंकलो. असंही यावेळी भुजबळ यांनी म्हटलं आहे. तेली, माळी, धनगर बघू नका ओबीसी म्हणून सर्वजण एकत्र या, असं आवाहनही यावेळी भुजबळ यांनी केलं आहे.

---

रुग्णालय येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचा नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन परळी वैजनाथ भाजप तालुकाध्यक्ष राजेश गित्ते यांनी केले आहे.

नव्या भारताचे शिल्पकार व भारताचे लोकप्रिय पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली गरीब व वांचित घटकांच्या उन्नतीसाठी व सेवाभावी कार्य करण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने देशभर 'सेवा पंधरवडा 2025' अयोजिय करण्यात आला आहे. या अंतर्गत परळी उपजिल्हा रुग्णालयात शुक्रवार, दि 19 सप्टेंबर 2025 रोजी सर्वसामान्य गरजू रुग्णांसाठी आरोग्य शिबीर व नेत्ररोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी सर्वोत्तम दान असलेले रक्तदान शिबिरही उपजिल्हा रुग्णालयात होणार आहे. या शिबिराचे उद्घाटन पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे. उपजिल्हा रुग्णालयात सकाळी 10 वाजता होणाऱ्या या आरोग्य शिबिरात परळी सह स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयाचे तज्ञ डॉक्टर तपासणीसाठी उपलब्ध असणार आहेत. स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय अंबाजोगाईच्या रक्तपेढी मार्फत होणाऱ्या रक्तदान शिबिरात परळी व परिसरातील रक्तदात्यांनी रक्तदान करण्यासाठी उपस्थित रहावे.

परळी मतदार संघातील रुग्णांनी आरोग्य तपासणी शिबीर, नेत्ररोग तपासणी शिबीर व रक्तदान शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन परळी वैजनाथ भाजप तालुकाध्यक्ष राजेश गित्ते यांनी केले.

---

रुग्णालयात शुक्रवार, दि 19 सप्टेंबर 2025 रोजी सर्वसामान्य गरजू रुग्णांसाठी आरोग्य शिबीर व नेत्ररोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी सर्वोत्तम दान असलेले रक्तदान शिबिरही उपजिल्हा रुग्णालयात होणार आहे. या शिबिराचे उद्घाटन पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे. उपजिल्हा रुग्णालयात सकाळी 10 वाजता होणाऱ्या या आरोग्य शिबिरात परळी सह स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयाचे तज्ञ डॉक्टर तपासणीसाठी उपलब्ध असणार आहेत. स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय अंबाजोगाईच्या रक्तपेढी मार्फत होणाऱ्या रक्तदान शिबिरात परळी व परिसरातील रक्तदात्यांनी रक्तदान करण्यासाठी उपस्थित रहावे.

परळी शहर व परिसरातील नागरिकांनी मोफत आरोग्य व नेत्र तपासणी शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन भाजपा शहराध्यक्षा सौ उमाताई समशेट्टे यांनी केले आहे.

---

वाघाळा, गोपाळपूर, बोधेगाव, कावळेवाडी आणि राक्षस वाडी,गडदेवाडी या अतिवृष्टीग्रस्त भागांना भेट दिली. शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन पिकांची झालेली दयनीय अवस्था पाहिली. शेतकऱ्यांच्या शेतातील विजेचे पोल कोलमडून पडले आहेत तसेच नदी काठावर असलेले बंधारे पूर्ण पाण्याच्या पुराच्या वेगाने वाहून गेले आहेत. या ठिकाणी शेतकऱ्यांशी त्यांनी थेट संवाद साधून त्यांचे प्रश्न, अडचणी आणि व्यथा जाणून घेतल्या.

शेतकऱ्यांचा आक्रोश"पिके उद्ध्वस्त झाली आहेत, कर्ज कसे फेडायचे, घरखर्च कसा भागवायचा?" अशा प्रश्नांनी शेतकरी शासनाकडे पाहत आहेत. काही ठिकाणी शेतकरी डोळ्यात पाणी आणून आपल्या समस्या मांडत होते. पिके गेल्याने जनावरांसाठी चारा टंचाई निर्माण होईल, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली.

शासनाकडे ठाम मागणीया वेळी प्रा. मुंडे म्हणाले की, "शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. पिके पाण्यात संपूर्ण बुडाली आहेत. पूर्ण खरीप हंगाम शेतकऱ्यांचा वाया गेला आहे. शासनाने तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत जाहीर करावी. या भागात ओला दुष्काळ घोषित करून शेतकऱ्यांना प्रती हेक्टरी एक लाख रुपयांची तसेच शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करून कर्जमाफी देण्यात यावी , अन्यथा शेतकरी जगणे कठीण होईल."कार्यकर्त्यांची उपस्थिती या पाहणी दौऱ्यात विनायक गडदे,छत्रपती कावळे, बालासाहेब शिंदे,श्रीनिवास कुलकर्णी,रघुनाथ कावळे,मारोती कौचले,रावसाहेब कावळे,राधाकिशन कावळे,नरसिंग कावळे, गोकुळ पांढरे, मोकिंदकावळे,हनुमंत मकर,केरबा कावळे, नारायण मकर, बालासाहेब शेळके,बाळू कावळे, भागवत सलगर, अनंत सलगर, रतन नवगरे, सखाराम कराड, गणेश कराड, स्थानिक कार्यकर्ते व गावकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

---

होते. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरे यांच्या निवासस्थानी भेट दिली.यावेळी कौटुंबीक भेटीनंतर दोन्ही ठाकरे बंधूंमध्ये पहिल्यांदाच राजकीय बैठक पार पडली, या बैठकीला शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊत तसेच अनिल परब देखील उपस्थित होते. या बैठकीमध्ये महापालिका निरवडणुकीसंदर्भात वाटाघाटीवर चर्चा झाल्याची माहिती समोर आली होती.दरम्यान आजा शिवसेना भवन येथे शिवसेना ठाकरे गटाच्या शाखाप्रमुखांची बैठक उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीमध्ये पार पडली, या बैठकीमध्ये बोलताना उद्धव ठाकरे यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. मनसेसोबतच्या युतीचा निर्णय लवकरच घेऊ, मात्र तुम्ही निवडणुकीच्या तयारीला लागा असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

---

मोर्चाला डॉ.बाबासाहे आंबेडकर पुतळ्यापासून सुरुवात करण्यात आली होती. या मोर्चामध्ये अनेक अनुयायांची उपस्थिती होती. मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.

---

जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सरपंच माऊली तात्या गडदे, उपसरपंच तसेच ग्रामस्थांनी केले आहे.

"गाव हा विकासाचा नकाशा, गावावरून देशाची परीक्षा, गावाची भंगत अवदशा, येईल देशा" राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेतील या ओळींप्रमाणे शेतकरी हा देशाचा कणा आहे. गाव सुधारले पाहिजे, शेतकरी सुधारला पाहिजे तरच राष्ट्राची उन्नती होईल. आज आपल्या भागातील शेतकऱ्यांच्या शेकडो समस्या आहेत, त्यावर मात्र कोणीही आवाज उठवत नाही. शेतकऱ्यांचा आवाज बुलंद झाला पाहिजे, त्यांच्या समस्या शासन दरबारी पोचल्या पाहिजेत. याद्दष्टीने त्यांचा प्रतिनिधी म्हणून ग्लोबल विकास ट्रस्ट काम करायला तयार आहे. आत्तापर्यंत 30 हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांपर्यंत संस्था पोचली असून, विविध प्रकारचे लाभ त्यांना मिळवून दिले आहेत. आधुनिक शेती, शेतकऱ्यांच्या समस्या आणि त्यावरील उपाययोजना करण्याच्या द्दष्टीने जलनायक मयंक गांधी शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. बोधेगाव येथे आज शुक्रवार, दिनांक 19 सप्टेंबर रोजी सकाळी 8.30 वाजता ग्राम विकास मंथन कार्यक्रम होत असून, त्या कार्यक्रमास पंचक्रोशीतील सर्व गावांमधून जास्तीत जास्त संख्येने शेतकरी बांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन बोधेगावचे सरपंच माऊली तात्या गडदे, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सेवा सहकारी सोसायटीचे संचालक तसेच ग्रामस्थांनी केले आहे.

*जलनायक मयंक गांधी शेतकऱ्यांच्या बांधावर!*अतिवृष्टीने बाधित झालेल्या मलनाथपूर, परचुंडी, भिलेगाव, वाघाळा आदी गावांना गुरुवारी जलनायक मयंक गांधी यांनी भेटी दिल्या. नुकसान झालेल्या शेतांची पाहणी करून, नद्या व नाल्यांच्या अवस्थेचा एकंदर आढावा घेतला. शेकडो एकर शेती पाण्याखाली गेली असल्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. झालेल्या आपत्तीची भरपाई होणार नाही, मात्र शेतकऱ्यांना दिलासा मिळावा यासाठी त्यांना आधार देणे गरजेचे आहे. बाधित वरील सर्व गावांतून पापनाशी नदी जाते. ग्लोबल विकास ट्रस्टकडून येणाऱ्या काळात या नदीचे खोलीकरण व रुंदीकरण करून देण्याचे आश्वासन जलनायक मयंक गांधी यांनी शेतकऱ्यांना दिले. झालेच तर ज्यांच्या शेतीचे नुकसान झाले आहे त्यांच्या शेतीचा वास्तविक सर्व्हे करून पुढील उपाययोजना करण्याचा मानस त्यांनी बोलून दाखवला.

---

मिळावं म्हणून मुंबईमध्ये काही दिवसांपूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी उपोषणाला सुरुवात केली होती, लाखो मराठा बांधव हे जरांगे पाटील यांच्या आंदोलनामध्ये सहभागी झाले होते. या आंदोलनाला यश आलं, सरकारने मनोज जरांगे पाटील यांच्या काही मागण्या मान्य केल्या आहेत, तर काही मागन्या माण्य करण्यासाठी वेळ मागितला आहे, मराठा समाजाची जी मुख्य मागणी होती, राज्यात हैदराबाद गॅझेट लागू करा त्याचा जीआर सरकारने काढला आहे, त्यानंतर आता मनोज जरांगे पाटील यांनी ही मोठी घोषणा केली आहे.दरम्यान राज्यात हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा सरकारने जीआर काढल्यानंतर आता ओबीसी समाजानं आक्रमक भूमिका घेतली आहे. ओबीसी समाजाकडून या जीआरला विरोध होत आहे. मराठा समाजाला आमच्यामधून आरक्षण नको अशी भूमिका ओबीसी समाजाची आहे, तर दुसरीकडे याच गॅझेटवरुन बंजारा समाज आणि आदिवासी समाज देखील आमने-सामने आल्याचं पहायला मिळत आहे. आमचा एसटीमध्ये समावेश करावा अशी मागणी बंजारा समाजाची आहे.

## पान 4 वरुन

नाथापूर येथील एका व्यक्तीनेही ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरुन आत्महत्या केली होती.घटनास्थळावरुन मिळालेल्या माहितीनुसार, निवृत्ती यादव हे बर्दापूर गावातील पारावर सुरु असलेल्या चर्चेत नियमित सहभागी होत. ते ओबीसी आरक्षण संपल्यामुळे त्यांच्या नातवाला भविष्यात नोकरी मिळणार नाही, या विचाराने चिंताग्रस्त होते. या नैराश्यातून त्यांनी शेतातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. गावकऱ्यांनी ही घटना घडल्याची माहिती पोलिसांना दिली. काही दिवसांपूर्वी बीड तालुक्यातील नाथापुर गावात गोरख नारायण देवडकर या 50 वर्षीय व्यक्तीने आत्महत्या केली आहे. ओबीसी आरक्षण जात असल्याच्या विवंचनेतून या व्यक्तीने आत्महत्येचं पाऊल उचलल्याचं त्यांच्या कुटुंबाने सांगितले. गोरख देवडकर यांना पाच मुली असून दोन मुली पोलीस भरतीची तयारी करत आहेत. मात्र सध्या राज्यातील आरक्षणाची स्थिती पाहता मुलीच्या शिक्षणाचे कसे होईल? असा प्रश्न त्यांना सतावत होता. याच विवंचनेतून त्यांनी आत्महत्या केली. जिल्हा रुग्णालयात देवडकर यांचा मृतदेहाचे शवविच्छेदन सुरु असून राज्य सरकारने आमच्या कुटुंबाचा विचार करावा अशी मागणी पीडित कुटुंबाने केली आहे.

तसेच धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील सारोळा मांडवा गावात 55 वर्षीय शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मयत शेतकऱ्याचे नाव माणिकराव डोईफोडे असे असून, ओबीसी आरक्षण जाणार या विवंचनेतून त्यांनी आत्महत्या केली असल्याचा दावा त्यांच्या नातेवाईकांनी केला आहे.

---

सविस्तर माहिती मिळालेली नसून ते अविवाहित होते. अमोल लव्हारे हे अत्यंत मनमिळावू स्वभावाचे असल्याने त्यांच्या मृत्यूने गावात हळहळ व्यक्त होत आहे.

---

मधून प्रथम आली आहे.सोलर टेक्रिशियन - या प्रथम वर्ष व्यवसाय अभ्यासक्रम ट्रेड मधून गणेश बाबासाहेब मदने 96.50% टक्के ,प्रथम गोरख संपत मिसाळ 95.50% टक्के,गणपती वैजनाथ मोहिते 94% टक्के ,मेघराज सचिन कवचट 92.66% टक्के,कौस्तुभ अनुप कुमार कुसुमकर 89.30% टक्के ,दीपक विजयकुमार गिते 89 .00 टक्के, सत्यजित दत्तात्रय डाके 89 0/0 टक्के, या विद्यार्थ्यांनी उत्तम प्रकारे यश संपादन केले आहे . हेल्थ सॅनिटरी इन्स्पेक्टर - या ट्रेडचे यशस्वी विद्यार्थी सागर कांबळे 98.50% टक्के ,अमोल गिरी 93.50% टक्के,बालाजी दहिफळे 93% टक्के,महेश देशमुख 93% टक्के,राज लोंढे 92.33% टक्के,भागवत कोळपेवाड 91 .0/0टक्के, प्रथम वर्षे वीजतंत्री (इलेक्ट्रिशन) शोभा शेख 94.50% टक्के,रुपेश जाधव 93.66% टक्के ,

प्रथम वर्ष तारतंत्री( वायरन) विकास राठोड 88.33% टक्के ,संकेत भताने 86 0/0टक्के ,माऊली मुंडे 85.67 टक्के , मोकींद दहिफळे 86% टक्के द्वितीय वर्षवर्षे इलेक्ट्रिशियन व वायरमन ज्योती नारंगी 94.33% गणेश दहिफळे 88.83% टक्के ,सिद्धेश्वर पाळवदे 87% टक्के ,ओम गिरी 88.50% टक्के ,वैभव कराड 85.33% टक्के ,सचिन मुंडे 88.83 टक्के, शिवकरण मोठे 88.50% टक्के ,श्रीनाथ चाटे 88.50% टक्के ,रंजीत जंगले 85.50% टक्के ,आधी विद्यार्थी यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले आहेत या उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

*चौकट- हेल्थ सॅनिटरी इन्स्पेक्टर या नवीन असलेल्या ट्रेडमध्ये राज्यात सर्वप्रथम येण्याचा मान हा सागर कांबळे या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून श्री वैद्यनाथ आयटीआय कॉलेजला मिळाला* यावर्षी इलेक्ट्रिशन वायरमन ची पहिली बॅच आणि हेल्थ सॅनिटरी इन्स्पेक्टर व सोलर टेक्रिशियन ची दुसरी बॅच बाहेर पडली गतवर्षीप्रमाणे याही वर्षी विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवून यशाची परंपरा कायम राखली आहे.

---

काम केले आहे.कोणतीही निवडणूक असो राष्ट्रवादी पक्षाचे ते पहिल्यापासून एकनिष्ठ कार्यकर्ते म्हणून त्यांच्या कार्याची ओळख आहे. राष्ट्रवादी कॉँग्रेस फुटुन दोन गट पडले तरी त्यांनी शरद पवार साहेबांचे राष्ट्रवादी सोबत एकनिष्ठपणे राहिले. गेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांचे त्यांनी एकनिष्ठेने काम केले होते त्याचेच फळ म्हणून खा.बजरंग सोनवणे यांनी प्रा.प्रकाश जेधे यांच्यावर विश्वास दाखवत त्यांची बीएसएनएलच्या सदस्यदी नियुक्ती केली आहे. प्रकाश जेधे हे राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी (शरचंद्र पवार पक्षा)चे सक्रिय कार्यकर्ते असून खा.बजरंग सोनवणे यांचे खंदे समर्थक आहेत. प्रकाश जेधे यांनी राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या (शरचंद्र पवार) गटाच्या वतीने लढवल्या जाणाऱ्या सर्व निवडणुकांमध्ये व संघटनात्मक बांधणीत महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे.प्रकाश जेधे यांनी यापूर्वी वडवणी तालुका रोजगार हमी योजना समितीच्या सदस्य पदी ही काम केलेले आहे. सदरील नियुक्ती बद्दल प्रकाश जेधे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

---

अत्यावश्यक आहे, अशी मागणी सरपंच गंगाबाई हंगे यांच्या वतीने राजू हंगे यांनी केली. या संदर्भात वरिष्ठांकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला आहे, परंतु आजवर शाळेचे स्थलांतर झालेले नाही, अशी खंत शाळेचे मुख्याध्यापक दत्ता हरी कवडेवाड यांनी व्यक्त केली. तालुक्यातील डोंगरपट्ट्यातील नागापूर जिल्हा परिषद गटातील वानटाकळी गावाजवळून वाहणाऱ्या. वाण नदीच्या पुरामुळे गावकऱ्यांना त्रासाला सामोरे जावे लागते. नदीकाठी संरक्षणभिंत नसल्यामुळे अतिवृष्टीच्या वेळी सोमवारी पहाटे पाणी थेट गावात घुसले आणि ग्रामस्थांची प्रचंड तारांबळ उडाली. पुरामुळे वानटाकळीतील 200 हेक्टर जमीन खरचटून गेली आहे आणि पिकांची नासाडी झाली आहे. पूलही वाहून गेला आहे या पुलावरुन वानटाकळीच्या ग्रामस्थांना वाहतूक करणे मुश्किलीचे झाले आहे. दरम्यान, माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी मंगळवारी अतिवृष्टी भागात दौरा केला. या दौऱ्यामध्ये त्यांनी वानटाकळी गावाला भेट दिली आहे.

---

विचारसरणीत झपाट्याने बदल होत असतात. त्यामुळे पालक व शिक्षकांनी मिळून त्यांना योग्य दिशा देणे अत्यावश्यक आहे.पालकांनी मुलांबरोबर जास्तीत जास्त वेळ घालवावा, त्यांच्या समस्या शांतपणे ऐकाव्यात आणि त्यांना प्रोत्साहन द्यावे. घरी मिळणारी संस्कारमूल्ये आणि शाळेत मिळणारे ज्ञान यांचा समन्वय झाला, तरच विद्यार्थ्यांचा खरा सर्वांगीण विकास होईल.आजची पिढी अत्यंत हुशार व तल्लख आहे. त्यांच्या क्षमतांचा योग्य वापर झाला, तर भविष्यात ते समाजाचे सक्षम नेतृत्व करु शकतात. वाचन, लेखन, गणितीय कौशल्य, विज्ञाननिष्ठ विचारसरणी, क्रीडा, कला आणि सांस्कृतिक मूल्ये या सर्व गोष्टींमध्ये संतुलन साधणे गरजेचे आहे. मुलांमध्ये जिज्ञासा टिकवणे, शिस्त रुजवणे आणि आत्मविश्वास वाढवणे हेच शिक्षक व पालक यांचे सामायिक ध्येय असले पाहिजे." पालकांनी या मेळाव्यात सक्रिय सहभाग घेतला. काहींनी आपल्या मुलांच्या अभ्यासातील प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले, तर काहींनी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, तंत्रज्ञानाधारित अध्यापन, प्रयोगशील शिक्षण व उपक्रमाधारित अध्यापन बाबत शाळेचे मन भरुन कौतुक केले. पालकांनी शिक्षकांशी संवाद साधून आपल्या मुलांच्या वैयक्तिक प्रगतीबद्दल चर्चा केली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक निकालाबरोबरच वाचन-लेखन कौशल्य, एकाग्रता, वर्गातील वर्तणूक, सामाजिक जाणीवा याबाबत पालकांना सविस्तर माहिती दिली. विद्यार्थी केवळ अभ्यासातच नव्हे तर विविध उपक्रम, खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम यातूनही स्वतःला सिद्ध करत आहेत, असे सांगत शिक्षकांनी पालकांना समाधान दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. सूर्यवंशी सर तर आभारप्रदर्शन श्री. जाधव सर यांनी केले.या मेळाव्याचे यशस्वी आयोजन शाळेतील शिक्षकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी व व्यवस्थापनाने एकत्रितपणे केले. शेवटी उपस्थित पालकांनी अशा प्रकारच्या सुसंवाद उपक्रमामुळे शाळा व पालक यांच्यातील विश्वास वृद्धिंगत होऊन मुलांच्या प्रगतीला निश्चितच गती मिळते, असे मत व्यक्त केले.

---

"ग्रामस्थांनी कोणत्याही प्रकारची काळजी करु नये, प्रशासन आपल्या सोबत ठामपणे उभे आहे," असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.औषध वितरणाच्या वेळी प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ प्रशांत पाटील किट्टी आडगाव मंडळ माजलगाव तालुकाध्यक्ष रुपाली शरद कचरे, शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी, तालुका सरचिटणीस प्रदीप जाधवर,सुखदेव माने, डॉ. प्रशांत पाटील, आदी मान्यवर उपस्थित होते.

---

व्यक्त केले. भव्य अशा दिमाखदार सोहळ्याचे अध्यक्ष रो. सुधीर लातुरे ( प्रांतपाल 3132) हे होते. व्यासपिठावर रो. कल्याण कुलकर्णी , विनोद बजाज , दिगंबर महाजन , सौ. वर्षा भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती. राष्ट्रगीत , प्रतिमा पुजना नंतर स्वागत सोहळा संपन्न झाला. मराठवाडा मुक्ती दिनी कार्यक्रमाच्या प्रारंभीच प्रभाकर साळेगावकर यांची रचना असणारे मराठवाडा गीत युवा कलावंत कुणाल लवुळकर यांनी सादर करुन वातावरण मंगलमय केले. सुरेश देशपांडे यांचे आकर्षक भूमीअलंकरण सर्वांचे लक्ष वेधुन घेणारे ठरले. सुनियोजित , काटेकोर ,चिंतनशिल असे प्रास्ताविक प्रोजेक्ट चेअरमन सौ. वर्षा सोळंके यांनी केले. पुरस्कार प्राप्त शिक्षकातून महेश कुलकर्णी , रेश्मा आळणे यांनी कृतज्ञता पर विचार मांडले. प्रमुख पाहुणे कैलास दौंड यांनी आठवी च्या मराठी पाठ्यक्रमात असणारी गोधडी ही तर ढव्ह ही पावसाळी कविता सादरकरुन सभागृहाला हेलावुन टाकले. अध्यक्षीय समारोप करताना रो. सुधीर लातुरे म्हणाले , शिक्षण वंचिता पर्यंत सकस पणे पोहंचवण्या साठी रोटरी कटिबद्ध आहे. हॅपी स्कुल हा रोटरी चा ड्रीम प्रोजेक्ट आहे.

शिक्षक सेवेत समरसुन जावा आणि रोटरी ने त्यांचा सन्मान करावा हाच नेशन बिल्डर अवार्ड चा उद्देश आहे. क्लब सदस्यांचे व पुरस्कार प्राप्त शिक्षकांचे मी अभिनंदन करतो. मान्यवरांच्या हस्ते शाल , सन्मान चिन्ह , ग्रंथभेट , रोटरीचे प्रमाणपत्र , पुष्पगुच्छ याने सन्मानित करण्यात आलेल्या शिक्षक गौरव मुर्ती ... राजाराम शिवणकर , आसाराम कुरे , नंदलाल भंडारी , अशोक वाडेकर , रेश्मा आळणे , महेश कुलकर्णी , शिवशंकर भंडारे , मोमीन सिमा बेगम , ज्योती बनसोडे. , अर्जुन तौर , संजीवनी आगजाळ. कार्यक्रमाचे नेटके , अभ्यासपूर्ण , सुंदर सुत्रसंचालन रो. स्मिता लिंबगावकर यांनी केले. श्री सुरेश भानप , राजेश देशपांडे , डॉ. सुशिल लोढा , निरंजन वाघमारे , पंडीत तिडके , लता जोशी , लक्ष्मीनारायण मुंदडा , प्रभाकर साळेगावकर यांनी परिश्रम पुर्वक सारे नियोजन केले. नेशन बिल्डर आवार्ड सोहळ्यास , माजी आमदार मोहनराव सोळंके , गोविंद बजाज , शिरीष देशमुख , डॉ. शंकर जुजगर , प्रताप रांजवण , रविंद्र कानडे , सुरेंद्र रेदासणी , बी. एस. देशपांडे , डॉ. स्वानंद कुलकर्णी , शशिकिरण गडम , डॉ. मधुकर घुबडे ,डॉ. अर्चना पवार , संतोष मुळी , अर्चना मोरे , डॉ. अंजली अकोलकर , श्रीकृष्ण शेजुळ , रवी लवुळकर , अभिमन्यु इबिते , राहुल लंगडे , दामोदर संदीकर , संदिप गुंडेवार , सुधीर देशमुख , रामकिसनराव सोळंके , श्री डाके ,रमेश गीरी , कवी प्रविण काळे , ओम दायमा. , बाबुराव आडे , वैशाली देशपांडे , अर्चना भानप यांच्या सह अनेक मान्यवरांच्या उपस्थिती ने राजस्थानी मंगल कार्यालय खचाखच भरले होते. रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी चे अध्यक्ष विनोद बजाज यांनी सर्वांचे आभार मानले व देखण्या सोहळ्यास पुर्ण विराम मिळाला.

---

बाळासाहेब परांजपे, श्रीमती गोदावरीबाई टेके,दगडाबाई शेळके यांच्यासह लढ्यात शहीद झालेले बहिर्जी शिंदे व लढ्यात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष योगदान देणाऱ्या सर्व स्वातंत्र्य सेनानींना विनम्र अभिवादन करुन केज कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती डॉ. वासुदेव नेहरकर यांच्या हस्ते केज कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात ध्वजारोहण करण्यात आले . या वेळी सभापती अंकुशराव इंगळे, सचिव संतोष देशमुख व केज कृषी उत्पन्न बाजार समितीचे सर्व कर्मचारी उपस्थित होते*.

---

मधुर भाषा आहे.जनसंपर्कासाठी ती उत्तम माध्यम आहे. दळणवळण, प्रवास, शतीर्थयात्रा,राजकीय संपर्क, राजभाषा, व्यवहार भाषा म्हणून हिंदी भाषेकडे फार पूर्वी प्राचीन काळापासून पाहिले जात आहे. या भाषेतील साहित्य हे सर्वोत्कृष्ट आहे. हिंदी भाषेतील संत परंपरा,सूफी संप्रदायाची परंपरा ही जग विख्यात आहे. ईश्वराची आराधना करण्यासाठी संत मीराबाई,संत कबीरदास, तुलसीदास, सूरदास यांचे साहित्य हे समाजासाठी आजीवन प्रेरणादायी ठरणारे आहे. आत्ताच्या वर्तमान काळामध्ये साहित्य सम्राट ज्यांना ओळखले जाते, असे प्रेमचंद यांचे साहित्य हिंदी भाषेमध्ये जनसामान्यांचे साहित्य आहे.यामध्ये शेतकरी,मजूर, भारतीय जवान,कार्यालयातील दप्तर दिरंगाई,अशा अनेक प्रकारच्या विषयावर कहाणी, कादंबरी मधून विवेचन केले गेलेले आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ भालचंद्र कुलकर्णी यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना हिंदी भाषेचे महत्त्व पटवून दिले.तसेच आपण ज्याप्रमाणे आपल्या मायबोलीमध्ये कविता, कहानी अशा प्रकारच्या रचना लिहितो, तसेच हिंदी भाषेमध्ये सुद्धा साहित्य लेखन केले पाहिजे असे विद्यार्थ्यांना त्यांनी आवाहन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी संपादित केलेल्या "समकालीन साहित्य" या भितीपत्रकाचे अनावरण आदरणीय मंच यांच्यावतीने करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन विभाग प्रमुख डॉ गोविंद पांडव यांनी केले. मंचावर महाविद्यालयाचे उपाध्यक्ष श्री बब्रुवान शेंडगे,सदस्य श्री नारायणराव डिगे,डॉ मारुतीराव आंधळे,अंबाजोगाई येथील शेतकरी नेते श्री कालिदास आपेट उपस्थित होते.यावेळी महाविद्यालयाचे प्राध्यापक गोपीचंद घायतिडक, सुधीर पोकळे, डॉ सच्चिदानंद तांदळे, डॉ अशोक खेत्री, डॉ रामहरी मायकर, डॉ अशोक पवार, डॉ सुनील पाटील,रामेश्वर पवार, डॉ मनीषा ससाणे,प्रतिभा शेळके, विद्यार्थिनी विद्यार्थी उपस्थित होते.

---

या संस्थेची 11 वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार (दि.17) सप्टेंबर रोजी येथील कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात मध्ये खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.महात्मा जोतिबा फुले व स्वामी रामानंद यांच्या प्रतिमा पुजन करून सभेस सुरुवात करण्यात आली. यावेळी सभेस संबोधीत करताना श्री अघाव बोलत होते. सभेला संस्थेचे मार्गदर्शक तथा लोकमान्य पतसंस्थेचे अध्यक्ष पी.एस.घाडगे, संस्थेचे सचिव आलिशान काजी,लक्ष्मण मुंडे, मुख्याध्यापक लिंबाजी दहिफळे, प्राचार्य अरुण पवार,राजकुमार लाहोटी, लोकमान्य नागरी सह.पतसंस्थेचे (मल्टीस्टेट) मुख्यकार्यकारी अधिकारी नितीन वायचळे आदि मान्यवर उपस्थित होते. श्री अघाव म्हणाले, गेल्या 10 वर्षापूर्वी शिक्षक नेते तथा लोकमान्य पतसंस्थेचे अध्यक्ष पी.एस.घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झालेल्या या संस्थेचे सरत्या अर्थिक वर्षातील भागभांडवल 56 लाख 61 हजार रुपये आहे तर तालुक्यातील एकूण पंधरा शाळेतील 130 शिक्षक ,शिक्षकेत्तर कर्मचारी पतसंस्थेचे सभासद आहेत.संस्थेला सरलेल्या आर्थिक वर्षात 7 लाख 47 हजार 371 रुपये नफा झाला आसून संस्थेकडून सभासदांना पाच लाख रुपयापर्यंत साधे कर्ज दिले जाते तर एक लाखा पर्यंत तातडी कर्ज दिले जाते. संस्थेचा गेल्या पाच-सहा वर्षांपासून ऑडिट वर्ग अ आसल्याचे सांगून श्री अघाव यांनी सभासदांना 9 % टक्के रोखीने लाभांश देण्यात येणार असल्याची माहिती दिली. संस्थेचे मार्गदर्शक पी.एस.घाडगे तसेच सर्व संचालक,मुख्याध्यापक व सभासदांचे सहकार्य या बळावर संस्थेची प्रगतीकडे वाटचाल चालू असल्याचे श्री अघाव यांनी सांगितले. यावेळी संस्थेचे मार्गदर्शक पी.एस. घाडगे यांनी सभेस संबोधित केले. यावेळी संस्थेचे माजी संचालक महादेव धायगुडे, शिवाजी शिंदे, सौ.स्वाती इंगळे यांचा शाल, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.सभेचे सुत्रसंचालन संस्थेचे कोषाध्यक्ष अशोक जाधव यांनी केले तर आभार संचालक उत्तम साखरे यांनी मानले.सभा यशस्वी करण्यासाठी संस्थेचे संचालक बालाजी कांबळे, रवि मगर श्रीमती सुषमा नागरगोजे,भाग्यश्री साखरे,लोकमान्य नागरी पतसंस्थेचे शाखाधिकारी चंद्रशेखर सरकटे,महात्मा जोतिबा फुले पतसंस्थेचे व्यवस्थापक रमेश देशमुख यांच्यासह लोकमान्य नागरी पतसंस्थेचे सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. सभेला सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

देशभक्तीपर गीते गाऊन व भाषण करून मुक्तीसंग्रामातील सकल क्रांतीविराना अभिवादन केले.तदनंतर शाळेतील सहशिक्षक निवृत्ती मुंडे सर यांनी विद्यार्थ्यांना मुक्तीसंग्राम दिनाचे महत्त्व सांगितले तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षा शाळेच्या मुख्याध्यापिका सुलेखा मुंडे मॅडम आणि शाळेतील सहशिक्षक यांनी सर्व विध्यार्थ्यांना या मराठवाडा मुक्तीसंग्राम अमृत महोत्सव निमित संबोधित

हॅलो बीड
परळी संघर्षनेता
गुरुवार दि. 18 सप्टेंबर 2025


# ओबीसींचे आरक्षण संपले म्हणून निराशा व्यक्त करत; शेतातील झाडाला गळफास




ओबीसी आरक्षण संपलं आता माझ्या नातवाला नोकरी लागणार नाही.. या नैराश्यातून बर्दापूर येथील निवृत्ती पांडुरंग यादव यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली.. निवृत्ती यादव हे गावात पारावर सुरु असलेल्या चर्चेत सहभागी होत आता ओबीसींचे आरक्षण संपले म्हणून निराशा व्यक्त करत होते.. यादरम्यानच त्यांनी शेतातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली.

ओबीसी आरक्षण संपल्याच्या नैराश्यात बर्दापूर येथील निवृत्ती पांडुरंग यादव यांनी आत्महत्या केली. निवृत्ती यादव यांनी आपल्या नातवाला नोकरी लागणार नाही, अशी चिंता व्यक्त करत ताणात येऊन शेतातील झाडाला गळफास घेऊन आपले जीवन संपवले. ही घटना बीड जिल्ह्यात ओबीसी आरक्षणाशी संबंधित दुसरी आत्महत्या ठरली आहे. यापूर्वी, पान 3 वर

# मस्साजोग येथे विजेचा शॉक लागून कंत्राटी ऑपरेटरचा मृत्यू



केज : केज तालुक्यात मस्साजोग येथे एका कंत्राटी वीज ऑपरेटरचा शेतात असणाऱ्या डीपीचा शॉक लागून मृत्यू झाला.

बीड जिल्ह्यातील मस्साजोग (ता. केज) येथील अमोल तुळशीराम लव्हारे (वय, 28 वर्ष) हे मस्साजोग येथील 11 के.व्ही. वीज उपकेंद्रात कंत्राटी तत्वावर ऑपरेटर म्हणून काम करीत होते. गुरूवारी (दि.18) रात्री 8:00 च्या सुमारास अमोल लव्हारे यास शेतातील डीपीचा विजेचा शॉक लागून मृत्यू झाल्याची माहिती गावात मिळाली. त्यानंतर गावकऱ्यांनी वीज वितरणाचे अधिकारी आणि पोलिसांना याची माहिती दिली. दरम्यान, अमोल लव्हारे यांच्या मृत्यू बाबत अद्याप पान 3 वर

# श्री वैद्यनाथ आयटीआय कॉलेज हाळमच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

## नाविन्यपूर्ण अभ्यासक्रमांचा समावेश

परळी( प्रतिनिधी) तालुक्यातील हाळम सारख्या ग्रामीण भागामध्ये दयाधर्म सामाजिक प्रतिष्ठान हाळम या संस्थेच्या माध्यमातून मा. माधव मुंडे यांच्या मार्गदर्शनातून सुरु झालेले श्री वैद्यनाथ आय टीआय हे युनिट दरवर्षीप्रमाणे याही वर्षी उत्तुंग भरारी घेताना दिसत आहे .जुलै 2025 मध्ये घेण्यात आलेल्या प्रथम वर्ष व्यवसाय अभ्यासक्रम तसेच द्वितीय वर्षे व्यवसाय अभ्यासक्रम यांच्या एकत्रित निकाल 5 सप्टेंबर 2025 रोजी जाहीर झाला.




यामध्ये श्री वैद्यनाथ आय टीआय मधील विद्यार्थ्यांनी यशाचा उच्चांक गाठलेला आहे

चि. सागर राजू कांबळे या विद्यार्थी हेल्थ सॅनिटरी इन्स्पेक्टर या विद्यार्थ्याने 600 पैकी 591 गुण मिळवून 98.50% गुण प्रथम वर्ष सबंध मराठवाड्यामध्ये प्रथम येण्याचा बहुमान मिळवला .

तसेच द्वितीय वर्ष अभ्यासक्रम इलेक्ट्रिशनची विद्यार्थिनी कु. ज्योती नर्सिंग नारंगे हिने 600 पैकी 566 गुण मिळवत 94.33% सह कॉलेज पान 3 वर

# बीएसएनएल’च्या सल्लागार समितीवर प्रकाश जेधे यांची नियुक्ती

## खा. बजरंग सोनवणे यांच्याकडून निष्ठावंत कार्यकर्त्याला न्याय



वडवणी/प्रतिनिधी-: केंद्र सरकारच्या ‘भारत संचार निगम लिमिटेड’ च्या(BSNL) सल्लागार समिती(Advisory Committee) सदस्य पदी प्रकाश श्रीराम जेधे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ‘बीएसएनएल’च्या संचालक उर्वशी संघवान यांनी ही नियुक्ती केल्याचे पत्राद्वारे कळवले आहे. सदरील नियुक्ती ही बीड जिल्ह्याचे खा.बजरंग सोनवणे यांच्या शिफारशीवरून करण्यात आलेली आहे. या निवडीचे वडवणी तालुक्यातून त्यांचे कौतुक होत आहे.



बाहेगव्हाण या गावचे रहिवासी असलेले अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांनी या अगोदरही शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे एकनिष्ठपणे पान 3 वर

# पावसाळ्यात शाळा पाण्यात, विद्यार्थी मंदिरात! परळी तालुक्यातील वानटाकळी गावाची व्यथा!



परळी ( बीड) : सोमवारी झालेल्या अतिवृष्टीमुळे गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पाणी शिरले. परिणामी 140 विद्यार्थ्यांचे शिक्षण विस्कळीत झाले. पावसामुळे शाळा बंद करावी लागल्याने गुरुवारी हनुमान मंदिरात वर्ग भरवावे लागले. गेल्या सात वर्षांत तीन वेळा शाळेत पाणी घुसले असून, आठ-आठ दिवस शाळा मंदिरात किंवा समाजमंदिरात हलवावी लागल्याची वेळ आली आहे. सुमारे पन्नास वर्षांपूर्वी उभारलेली ही शाळा आजही तग धरून आहे. मात्र प्रत्येक पावसाळ्यात विद्यार्थ्यांची प्रचंड गैरसोय होते. विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी शाळेचे स्थलांतर करणे आणि नव्या स्लॅब इमारतीची उभारणी करणे पान 3 वर

# पालकांचा ध्यास, शिक्षकांची दिशा आणि विद्यार्थ्यांची मेहनत यातूनच घडतो यशाचा सोहळा. – श्री. दीपक तांदळे

## संस्कार प्राथमिक शाळा, विद्यानगर विभागातील इयत्ता सहावीच्या पालक सुसंवाद मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

परळी (प्रतिनिधी): श्री पद्मावती शिक्षण संस्था संचलित संस्कार प्राथमिक शाळा, विद्यानगर विभाग येथे इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी पालक सुसंवाद मेळाव्याचे भव्य आयोजन करण्यात आले. या मेळाव्याला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शाळा, शिक्षक व पालक यांच्यातील सुसंवाद अधिक दृढ व्हावा आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता यावा, हा या उपक्रमामागचा मुख्य हेतू होता.





कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. कैलास तांदळे (अध्यक्ष, श्री पद्मावती शिक्षण संस्था) होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री. दीपक तांदळे (सचिव, श्री [illegible] पद्धतीने सत्कार करण्यात आला.या प्रसंगी श्री. दीपक तांदळे यांनी आपल्या मनोगतात म्हटले की, “सहावीचा वर्ग हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील अत्यंत महत्वाचा टप्पा आहे. या वयात त्यांच्या पान 3 वर

## सांडस चिंचोली गावाला बेटाचे स्वरूप

# » मंत्री पंकजा मुंडे यांच्या सूचनेनुसार ड्रोनद्वारे औषध गोळ्यांचे वितरण



माजलगाव प्रतिनिधी :तालुक्यातील सांडस चिंचोली गावाला महापुरामुळे बेटाचे स्वरुप प्राप्त झाले असून गावाचा संपर्क तुटल्याने ग्रामस्थांची मोठी गैरसोय होत आहे. या परिस्थितीची तात्काळ दखल घेत लोकनेत्या, ग्रामविकास मंत्री नामदार पंकजा मुंडे यांनी प्रशासनाला उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या.

याअनुषंगाने आज मंगळवारी ड्रोनच्या साहाय्याने गावात आवश्यक औषध गोळ्यांचे वितरण करण्यात आले. याबाबतची माहिती जळगाव मंडळ अध्यक्षा रुपाली शरद कचरे यांनी दिली.

मागील तीन दिवसांपासून पूरपाण्याच्या विळख्यात अडकलेल्या सांडस चिंचोलीतील ग्रामस्थांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने जलदगतीने ही मोहीम राबवली. पान 3 वर

# नव्यापिढीस जगाशी जोडण्यात शिक्षकांचा मोठा वाटा असतो- प्रसिद्ध साहित्यिक डॉ. कैलास दौंड




माजलगाव ( अनंत घडसिंगे ) :- राष्ट्र उभारणीस शिक्षक जबाबदार असतात , कोवळी मने सकारात्मक विचारांनी फुलविणारा शिक्षक निर्भय राहु शकतो. कामाप्रती निष्ठा हा ज्यांचा स्थायी भाव तेच रोटरी सारख्या जागतिक संघटनेकडुन गौरवास पात्र ठरतात. नवी पिढी जगाशी जोडण्यात शिक्षकांचा मोठा वाटा असतो.

असे प्रतिपादन सुप्रसिद्ध कवी डॉ. कैलास दौंड यांनी काल रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीच्या राष्ट्रशिल्पकार पुरस्कार प्रदान कार्यक्रमात राजस्थानी मंगल कार्यालय येथे पान 3 वर

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त कृषी उत्पन्न बाजार समितीत ध्वजारोहण संपन्न



प्रकाश मुंडे/केज तालुका प्रतिनिधी*:- आज 17 सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन , निजामशाही च्या जुलमी राजवटीतुन मराठवाडा मुक्त झाला .याला 74 वर्ष पूर्ण झाले असून आपण 75 व्या वर्षात पदार्पण करत आहोत .17 सप्टेंबर 1948 रोजी मराठवाड्यात तिरंगा फडकला, मराठवाडा मुक्ती संग्राम मध्ये योगदान देणारे व मराठवाडा मुक्तिसंग्राम मध्ये संघर्ष करणाऱ्या तसेच बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्य सेनानींना केज कृषी उत्पन्न बाजार समितीच्या ध्वजारोहण कार्यक्रमात विनम्र अभिवादन करण्यात आले. यामध्ये मराठवाडा मुक्तिसंग्रामाचे नेतृत्व करणारे स्वतंत्र सैनिक स्वामी रामानंद तीर्थ, गोविंभाई श्राफ, विजेयन्द्र काबरा, दिगंबर बिंदू, शंकरराव नाईक, पान 3 वर

# हिंदी भाषा ही जनसंपर्काची मधुर भाषा आहे - श्री पंजाबराव मस्के



वडवणी प्रतिनिधी

हिंदी भाषेचा प्रचार आणि प्रसार हा केवळ भारत देशामध्ये नाही, तर पूर्ण जगामध्ये हिंदी भाषेचे महत्त्व वाढत आहे. परदेशात राहणारे अनिवासी भारतीय आणि तेथील हिंदी प्रेमी साहित्यकार यांच्यामुळे आज हिंदी भाषेला वैश्विक दर्जा प्राप्त होत आहे,असे मत श्री पंजाबराव मस्के पाटील यांनी व्यक्त केले.

लोकमान्य टिळक महाविद्यालयात हिंदी सप्ताहचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महाविद्यालयात वक्तृत्व,निबंध, विविध प्रकारच्या स्पर्धा घेण्यात येत आहेत.

या कार्यक्रमात बोलताना श्री मस्के म्हणाले की, हिंदी भाषा ही पान 3 वर

# शिक्षणाशिवाय सर्वांगीण प्रगती अशक्य - IAS किरणकुमार गित्ते

## ➡ म. सा.प.च्या आदर्श शिक्षक पुरस्कारांचे स्व. सुवालालजी वाकेकर स्मृती सेवागौरव पुरस्कारांचे थाटात वितरण





परळी (प्रतिनिधी):- मराठवाडा साहित्य परिषद परळी वैजनाथ शाखेच्या वतीने दरवर्षी देण्यात येणारे आदर्श शिक्षक पुरस्कार, स्व. सुवालालजी वाकेकर स्मृती सेवागौरव पुरस्कार, साहित्य सेवागौरव पुरस्कार तसेच विशेष सेवा कार्यगौरव पुरस्कार येथील वैद्यनाथ कॉलेजच्या सभागृहात त्रिपुरा राज्याचे बांधकाम,आरोग्य, पर्यटन,सांस्कृतिक कार्य विकास सचिव किरणकुमार गित्ते साहेब यांच्या शुभहस्ते वितरित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परळी मसापचे अध्यक्ष विजयजी वाकेकर तर प्रमुख पाहुणे म्हणून जवाहर एज्युकेशन सोसायटीचे सचिव दत्ताप्पा इटके गुरुजी,अंबाजोगाई मसापचे अध्यक्ष अमर हबीब, सेवानिवृत्त नायब तहसीलदार बाबुराव रुपनर, परळी मसापचे मार्गदर्शक बाळासाहेब देशमुख,प्राचार्य जगतकर यांची प्रमुख उपस्थिती होती. पान 3 वर

# मराठवाड्यातील जनतेने मिळवलेले हे स्वातंत्र्य म्हणजे आपल्या संस्कृतीचे , भाषेचे आणि स्वाभिमानाचे पुनर्जन्म आहे-दीपक तांदळे

## संस्कार प्राथमिक शाळा, विद्यानगर विभागामध्ये मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा

परळी ( प्रतिनिधी ) - शहरातील श्री पद्मावती शिक्षण संस्था संचलित, संस्कार प्राथमिक शाळा,विद्यानगर विभागात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. कैलास तांदळे (अध्यक्ष, पद्मावती शिक्षण संस्था) प्रमुख पाहुणे श्री. दीपक तांदळे (सचिव, पद्मावती शिक्षण संस्था) तसेच श्री. अमरशील गायकवाड सर (प्र.मुख्याध्यापक संस्कार प्राथमिक शाळा ) यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्वामी रामानंद तीर्थ व सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रगीत, महाराष्ट्रगीत, प्रतिज्ञा, ध्वजगीत, सादर करण्यात आले.



मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त शाळेची सजावट व आकर्षक रांगोळी काढण्यात आली होती. तसेच भाषण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती .त्यामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी मराठी,हिंदी व इंग्रजी भाषेत मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त भाषणे केली. पान 3 वर

# संस्थेच्या संचालक मंडळाचा पारदर्शक कारभार - पी.एस.घाडगे

## सभासदांना 9 टक्के रोखीने लाभांश मिळणार - बंडू अघाव

## » महात्मा ज्योतिबा फुले शिक्षक पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न



परळी / प्रतिनिधी येथील मान्यताप्राप्त, खासगी प्राथमिक, माध्यमिक विविध अनुदानीत शाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या महात्मा ज्योतिबा फुले शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सभासदांना 9 % टक्के रोखीने लाभांश देण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष बंडू अघाव यांनी दिली. तर पतसंस्थेच्या संचालक मंडळाचा कारभार पारदर्शक आसून पतसंस्थेची योग्य दिशेने प्रगतीकडे वाटचाल सुरु आसल्याचे मत पी.एस.घाडगे यांनी व्यक्त केले. पान 3 वर

# पापनाथेश्वर माध्यमिक विद्यालय व इंदिरा बालसदन नाथरा येथे 77 वा मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) श्रीनाथ मानव सेवा मंडळ संचलित पापनाथेश्वर माध्यमिक विद्यालय नाथरा व इंदिरा बालसदन नाथरा येथे 77वा मराठवाडा मुक्ती संग्राम अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.अशा या मंगल दिनी सर्व प्रथम पापनाथेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या तिरंग्याचे ध्वजारोहण शाळेच्या मुख्याध्यापिका सुलेखा मुंडे(कराड) मॅडम यांच्या शुभहस्ते करण्यात आले तसेच इंदिरा बालसदनच्या तिरंग्याचे ध्वजारोहन सदनचे अधीक्षक सुनील कराड सर यांच्या शुभहस्ते करण्यात आले.या प्रसंगी उपस्थित शाळेतील सर्व विध्यार्थी,सहशिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी,गावातील नागरिक, युवक तसेच निमंत्रित पाहुणे सर्वांनी आपल्या देशाची शान असणाऱ्या तिरंग्याला सलामी देऊन मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचा विजय असो, भारतमाता की जय आणि वंदे मातरम असा जयघोष केला. त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी पान 3 वर





माजलगाव (अनंत घडसिंगे ) :- लोकनेते सुंदररावजी सोळंके नागरी सहकारी पतसंस्था माजलगावचे चेअरमन पदी श्री.विरेंद्रदादा सोळंके यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री आर.सी.बडगुजर साहेब समवेत श्री डी.एम.वरे जनरल मॅनेजर(आसवनी व उपपदार्थ),श्री रवि देशमुख मुख्य शेतकी अधिकारी,श्री सुरेश लगड सचिव,श्री भोसले ऊस पुरवठा अधिकारीसह आदि..